- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २८ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२९ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**

- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...

- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# एआयच्या मदतीने पंढरपुरात ३२ लाख भाविकांची मोजणी

## सोलापूर ग्रामीण पोलिसांचा देशातील पहिला अभिनव प्रयोग

**वृत्तसंस्था, पंढरपूर**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठलाचा आषाढी एकादशी सोहळा शनिवारी पार पडला. आषाढी वारी २०२६ मध्ये सोलापूर ग्रामीण पोलिस दलाने अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून तीन दिवसात तब्बल ३१ लाख ९८ हजार १२९ म्हणजेच सुमारे ३२ लाख भाविकांची मोजणी करण्यात आली. पारंपरिक मोजणीतील त्रुटींवर मात करत ड्रोन, एआय कॅमेरे आणि क्रॉस-कॅमेरा ट्रॅकिंगच्या सहाय्याने गर्दी व्यवस्थापनाचा देशात एक आदर्श निर्माण करण्यात आला. सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली सेंटेंटलॉजिक्स या तंत्रज्ञान संस्थेच्या सहकार्याने कॉगनेटिव्ह व्हिज्युअल ुमन न्यूरल एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. २४ ते २६ जुलै २०२६ या कालावधीत पंढरपूर शहरात प्रवेश करणा-या प्रत्येक भाविकाची युनिक ओळख तयार करून अचूक मोजणी करण्यात आली. एआय प्रणालीच्या नोंदीनुसार २४ जुलै रोजी ६ लाख ७५ हजार २७४, २५ जुलै अर्थात आषाढी एकादशीच्या दिवशी १८ लाख ९६ हजार ५७३ तर २६ जुलै रोजी ६ लाख २६ हजार २८२ भाविकांनी पंढरपूरमध्ये प्रवेश केला. या ३ दिवसांत एकूण ३१ लाख ९८ हजार १२९ भाविकांनी पंढरीत आगमन केल्याची नोंद झाली.

विशेष म्हणजे, एखादा भाविक शहरातील विविध भागांत फिरत असताना वेगवेगळ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत दिसला



तरी त्याची पुन्हा मोजणी झाली नाही. क्रॉस-कॅमेरा ट्रॅकिंग तंत्रज्ञानामुळे एकाच व्यक्तीची एकच नोंद ठेवण्यात आली. तसेच एखादी व्यक्ती शहराबाहेर जाऊन पुन्हा प्रवेश करत असल्यास एआय प्रणालीने आधीच्या ओळखीची पडताळणी करून दुबार नोंद टाळली. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान नागरिकांच्या गोपनीयतेची विशेष काळजी घेण्यात आली. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन अ?क्ट तसेच डीजीपीआर नियमावलीनुसार कोणत्याही व्यक्तीचे छायाचित्र किंवा वैयक्तिक माहिती सर्व्हरवर साठविण्यात आलेली नसल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**प्रमुख प्रवेश मार्गांवर अत्याधुनिक एआय कॅमेरे**

या प्रकल्पासाठी पंढरपूर शहरातील प्रमुख प्रवेशमार्गांवर अत्याधुनिक एआय कॅमेरे बसविण्यात आले होते. सरगम चौक-इंदिरा गांधी चौक, तीन रस्ता-दगडी पूल, गोपाळपूर पूल, सावरकर चौक-मिलिटरी हॉस्टेल तसेच सांगोला चौक या प्रवेशद्वारांवरून शहरात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची चेहऱ्याची ठेवण, कपड्यांचा रंग, टोपी, पगडी यांसारख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून स्वतंत्र डिजिटल ओळख तयार करण्यात आली.

---

**थोडक्यात**

### १०, २० रुपयांच्या प्लास्टिक नोटा येणार

**आरबीआयने दिली पायलट प्रोजेक्टला मंजुरी**

**नवी दिल्ली :** भारतात लवकरच १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक (पॉलिमर) च्या नोटा पाहायला मिळू शकतात. केंद्र सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पॉलिमर नोटांच्या पायलट प्रोजेक्टला मंजुरी दिली आहे. त्यानुसार १० आणि २० रुपयांच्या १००-१०० कोटी पॉलिमर नोटा चाचणीसाठी जारी केल्या जातील. ही चाचणी यशस्वी ठरल्यास पॉलिमर नोटा मोठ्या प्रमाणात जारी करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाऊ शकतो.

केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तरात यासंदर्भात माहिती दिली. आरबीआयच्या पॉलिमर नोटांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. आता फक्त हा एक पायलट प्रोजेक्ट आहे. भारतातील हवामान आणि परिस्थितीत प्लास्टिक नोटा किती टिकाऊ आणि उपयुक्त ठरतात हे पाहिले जाणार आहे. लोकसभेत वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार सरकारने १० आणि २० रुपयांच्या पॉलिमर बँक नोटांना मंजुरी दिली आहे. आरबीआयच्या मते पॉलिमर नोटा सध्या चलनात असलेल्या कागदी नोटांच्या तुलनेत अधिक मजबूत आणि दीर्घकाळ टिकतात. काही देशांमध्ये प्लास्टिकच्या नोटांचा वापर सुरू आहे. त्याचे चांगले परिणाम पाहायला मिळाले आहेत, भारतात त्याचा प्रायोगिक पातळीवर वापर सुरु होईल. भारतीय रिझर्व बँकेने आपल्या केंद्रीय संचालक मंडळाच्या शिफारशीवरून रिझर्व्ह बँक अधिनियम १९३४ च्या कलम २५ अंतर्गत सरकारला मंजुरी दिली.

---

# महाराष्ट्र सायबरची धडक कारवाई




**वृत्तसंस्था, मुंबई**

कॉकरोच जनता पार्टीच्या देशभरातील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सायबर या राज्य सरकारच्या नोडल एजन्सीने डिजिटल विश्वात एक अत्यंत मोठी आणि धडक कारवाई केली आहे. सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करण्यासाठी सीमेपलीकडून चालवल्या जाणा-या ५०० हून अधिक संशयास्पद सोशल मीडिया प्रोफाइलची ओळख पटवण्यात आली आहे. या आंदोलनाचा गैरफायदा घेत सोशल मीडियावर अफवा, चुकीची माहिती आणि एआय-जनरेटेड बनावट मजकूर पसरवण्याचे मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान तपासात उघडकीस आले आहे.

महाराष्ट्र सायबरने ओपन-सोर्स इंटेलिजन्स, डेटा विश्लेषण, वर्तणूक अभ्यास आणि अत्याधुनिक एआय-फॉरेन्सिक उपकरणांचा वापर करून व्यापक तपास मोहीम राबवली. या तांत्रिक विश्लेषणात खालील धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय कट : सुमारे १०० सोशल मीडिया खाती भारताबाहेरून, विशेषतः पाकिस्तान आणि पश्चिम आशियातील देशांमधून चालवली जात असल्याचे निष्पन्न झाले.

**आक्षेपार्ह पोस्टवर कारवाई**

इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर), फेसबुक आणि युट्यूब या प्लॅटफॉर्मवरील तब्बल ४२९ आक्षेपार्ह पोस्ट आणि हँडल्स ओळखण्यात आले आहेत.

एआय आणि डीपफेकचा वापर : १४० हून अधिक पोस्ट आणि प्रोफाईलमध्ये गर्दीची खोटी चित्रे, कृत्रिम आवाज आणि लोकप्रतिनिधींचे व्हीडीओ मॉर्फ करून तयार केलेले डीपफेक व्हीडीओ वापरण्यात आले होते.

महाराष्ट्र सायबरच्या अत्याधुनिक ऑडिओ-व्हीडीओ फॉरेन्सिक टीमने या सर्व बनावट कंटेटची वैज्ञानिक पडताळणी केली आहे. संबंधित सर्व आक्षेपार्ह मजकूर आणि खाती तात्काळ ब्लॉक करण्यासाठी सोशल मीडिया मध्यस्थांमार्फत कायदेशीर कारवाई आणि प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आली आहे. कोणत्याही संवेदनशील विषयांवर सोशल मीडियावर व्यक्त होताना किंवा माहिती शेअर करताना नागरिकांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन महाराष्ट्र सायबरने केले आहे.

कोणतीही बातमी किंवा व्हिडीओ दिशाभूल करणारा वाटल्यास क्षणात पुढे पाठवणे टाळा. पडताळणी करा माहिती अधिकृत शासकीय स्त्रोतांकडून किंवा विश्वासार्ह वृत्तसंस्थांकडून तपासून घ्या. जबाबदारीने शेअर करा. खात्री पटल्याशिवाय कोणताही मजकूर फॉरवर्ड करू नका. सामाजिक शांतता बिघडवणाऱ्या संघटित नेटवर्कवर अशीच कठोर कायदेशीर कारवाई पुढेही सुरू राहील, असा कडक इशारा देण्यात आला आहे.

---

# सीजेपीचा पुन्हा आंदोलनाचा इशारा

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

कॉकरोच जनता पार्टी(सीजेपी)ने सोमवारी इशारा दिला की जर आंदोलकांवरील पोलीस कारवाई थांबली नाही आणि अटक केलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला नाही, तर ते पुन्हा आंदोलन सुरू करतील. पक्षाचे प्रवक्ते सौरव दास यांनी आरोप केला की, सरकारने करार मोडला आहे. बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये शेकडो विद्यार्थ्यांना अटक करून खोट्या खटल्यांमध्ये अडकवण्यात आले आहे. दिल्लीत झालेल्या या पत्रकार परिषदेत सीजेपी नेते आशुतोष रांका, सौरभ दास यांच्यासोबत ॲडव्होकेट कपिल सिब्बलही उपस्थित होते. ते म्हणाले या पक्षाच्या कायदेशीर बाबींमध्ये मदत करणे ही माझी भूमिका आहे. सीजेपीने सांगितले की,



आम्ही एक पोर्टल सुरू केले आहे, ज्याद्वारे पीडित विद्यार्थी त्यांच्या समस्या शेअर करू शकतात. ते केसची माहिती आणि व्हीडीओ देखील शेअर करू शकतात.

सीजेपी प्रवक्ते सौरव दास यांनी सोमवारी एक्स वर आरोप केला की आसाम, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये विद्यार्थी आणि आंदोलकांना ताब्यात घेतले जात आहे आणि त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. पक्षाचे म्हणणे आहे की, केंद्र सरकारने कोणत्याही आंदोलकावर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, या आश्वासनावर त्यांनी देशव्यापी आंदोलन स्थगित केले होते.

सीजेपीने इशारा दिला की, जर सरकारने आपल्या आश्वासनावरून माघार घेतली, तर हे लाखो तरुणांच्या विश्वासाशी केलेला विश्वासघात ठरेल. पक्षाने म्हटले की, जर उद्यापर्यंत ताब्यात घेतलेल्या सर्व लोकांना सोडले नाही आणि एफआयआर मागे घेतल्या नाहीत, तर ते पुढील आवश्यक पाऊल उचलतील.




---

# राज्यातील नोंदणी व मुद्रांक विभागात बढत्या

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्य शासनाच्या महसूल विभागांतर्गतणाऱ्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक गती देण्यासह विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याच्या धोरणाचा भाग म्हणून 'दुय्यम निबंधक श्रेणी-१, मुद्रांक निरीक्षक (अराजपत्रित गट-ब)' या संवर्गातील तब्बल १६० अधिकाऱ्यांना 'सह जिल्हा निबंधक, वर्ग-२ / सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ / मुद्रांक उपअधिक्षक' या संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेवरुन आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या वतीने आज (दि. २७ जुलै ) रोजी या संदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. नोंदणी व मुद्रांक विभागात एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर १६० अधिकाऱ्यांना सह दुय्यम निबंधक वर्ग-२ या पदावर पदोन्नती देण्याची ही पहिलीच ऐतिहासिक वेळ आहे.



"सर्वसामान्य नागरिकांना दस्त नोंदणीच्या सेवा जलद, पारदर्शक आणि विनाअडथळा मिळाव्यात, यासाठी महसूल विभाग कटिबद्ध आहे. विभागात दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावत आज एकाच वेळी १६० अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. यामुळे प्रशासकीय कामकाजाला गती मिळेल आणि दस्त नोंदणीसाठी कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचून त्यांना मोठा दिलासा मिळेल. रिक्त झालेली उर्वरित पदेही तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत."

**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

**नागरिकांना सेवा मिळणे होणार अधिक सुलभ**

नोंदणी व मुद्रांक विभाग हा दस्त नोंदणीची सेवा देण्यासोबतच मुद्रांक अधिनियमाची अंमलबजावणी करून राज्याच्या महसूल संकलनात महत्त्वाची भूमिका बजावतो. सर्वसामान्य नागरिकांचा विविध खरेदी-विक्री व करारांच्या दस्त नोंदणीसाठी या विभागाशी दैनंदिन थेट संबंध येत असतो. या पदोन्नतीमुळे कार्यालयांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदे भरली जाऊन दस्त नोंदणीचे कामकाज अधिक जलद आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

याशिवाय, या पदोन्नतीमुळे 'दुय्यम निबंधक श्रेणी-१ / मुद्रांक निरीक्षक' या संवर्गात रिक्त झालेल्या जागासुद्धा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्यामार्फत पदोन्नतीने तातडीने भरण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे नोंदणी विभागाची संपूर्ण प्रशासकीय साखळी अधिक सक्षम होणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

**विभागनिहाय पदोन्नतीचा तपशील**

राज्यभरातील विविध विभागांनुसार पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

- कोकण विभाग : ५९ अधिकारी
- पुणे विभाग : ४२ अधिकारी
- नागपूर विभाग : १९ अधिकारी
- छत्रपती संभाजीनगर विभाग : १५ अधिकारी
- नाशिक विभाग : १४ अधिकारी
- अमरावती विभाग : ११ अधिकारी

**एकूण : १६० अधिकारी**

संपादकीय लेखणीतून...

## लोकशाही जिंकली

केंद्र सरकारला अखेर झुरळांसमोर झुकावे लागले. अवघ्या दोन महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली जंतरमंतरवर गर्दी करणाऱ्या तरुणाईने प्रचंड विजय मिळवला. नीट पेपरफुटीप्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना शनिवारी राजीनामा द्यावा लागला. राजीनाम्याच्या घोषणेनंतर सरकार व आंदोलक यांच्यात आणखी एक बैठक पार पडली. आंदोलकांवरचे गुन्हे मागे घ्यावेत आणि नीट पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई द्यावी, या दोन्ही मागण्या सरकारने तत्त्वतः मान्य केल्या आहेत. याबाबत सरकारने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून सदिच्छेच्या भावनेतून आपण हे आंदोलन मागे घेत आहोत, अशी घोषणा सीजेपीतर्फे करण्यात आली. शुक्रवारी सरकार आणि आंदोलक यांच्यात चर्चेची पहिली फेरी झाली होती. त्याचवेळी प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत सरकार विचार करू शकते, असे संकेत दिले गेले होते. त्यानुसार शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास प्रधान यांनी आपण आपले राजीनामापत्र पंतप्रधान मोदी यांच्याकडे सोपवले असल्याचे सोशल मीडियामधून जाहीर केले. त्यानंतर थोड्याच वेळात सरकारसोबत आंदोलकांची दुसरी बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलकांच्या अन्य दोन मागण्या मान्य झाल्या. आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेणे व नुकसानभरपाई याबाबत सरकारने मान्य केलेल्या अटी ठराविक मुदतीत पूर्ण होतील असा विश्वास ठेवून सदिच्छेपोटी आम्ही आंदोलन मागे घेत आहोत अशी घोषणा पत्रकार परिषदेत आशुतोष रांका यांनी केली. नीट प्रकरणातील मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपयांची भरपाई देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार सरकारने विद्यमान नियमांनुसार सन्मानार्थ आर्थिक मदत देण्याचे मान्य केले.

तसेच देशभरातील आंदोलनकर्त्यांविरुद्ध दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेण्यास केंद्र सरकारने तत्त्वतः सहमती दर्शविली आहे. बैठकीत शिक्षणव्यवस्था आणि परीक्षा प्रणालीतील व्यापक सुधारणांसाठी सरकारसमोर पाच कलमी मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले असून, त्यावर पुढील चार आठवड्यांत पुन्हा चर्चा होणार आहे. दिल्लीसह देशातील विविध भागात आंदोलनकर्त्यांविरोधात अनेक एफआयआर दाखल करण्यात आले होते. हे सर्व गुन्हे मागे घेण्याची आणि भविष्यात कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याची मागणी सीजेपीने केली होती. दिल्लीसह भाजपशासित आणि भाजपच्या मित्रपक्षांच्या राज्यांमध्ये आंदोलनकर्त्यांविरोधात दाखल करण्यात आलेले सर्व एफआयआर मागे घेण्यास सरकारने सहमती दर्शविली आहे. या संदर्भात लेखी हमीपत्राचा मसुदा सरकारला देण्यात आला असून मंगळवारपर्यंत सरकारकडून लेखी हमी मिळण्याची अपेक्षा आहे. गत दहा दिवसांतील घडामोडींनी आपण अत्यंत व्यथित झालो असून हा प्रश्न आपल्या व्यक्तिगत प्रतिष्ठेचा नाही असे सांगत केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

परिस्थितीचा गैरफायदा देशविरोधी शक्तींनी घेऊ नये, देशाची एकता अबाधित राहावी, एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणीत अडकू नये आणि विद्यार्थ्यांनी आपला वेळ अभ्यासावर व करिअर घडवण्यावर केंद्रित करावा, या उद्देशाने आपण हा निर्णय घेत असल्याचे प्रधान यांनी नमूद केले. या सर्व बाबींचा विचार करून मी माझा राजीनामा पंतप्रधानांकडे पाठवला आहे, असे त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात सार्वजनिक वादाच्या पार्श्वभूमीवर राजीनामा देणारे प्रधान हे दुसरे केंद्रीय मंत्री ठरले आहेत. यापूर्वी २०१८ मध्ये मी-टू मोहिमेदरम्यान लैंगिक शोषणाचे आरोप झाल्यानंतर परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री एम. जे. अकबर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची बातमी समजल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजित दीपके यांनी वी हॅव डन इट असे म्हणत आंदोलकांना खबर दिली. ही पहिली विकेट आहे असे सूचक उद्गार काढत सुबह हो गयी है मामू असे म्हणत त्यांनी मोदींनाही इशारा दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत दीपके म्हणाले, तुम्ही आम्हाला कॉक्रोच म्हटले नसते तर मी भारतात परतलो नसतो, देशातील तरुण रस्त्यावर उतरले नसते, प्रधानांचा राजीनामा झाला नसता.

या सा-या गोष्टींबद्दल त्यांनी सरन्यायाधीशांचे आभार मानले. दीपके यांना सध्या विषमज्वर (टायफॉईड) झाला आहे. प्रधान यांच्या राजीनाम्याचे सोनम वांगचुक यांनी स्वागत केले असून, हा लोकशाहीचा विजय असल्याचे म्हटले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील सर्व विद्यार्थी आणि तरुणांचे अभिनंदन केले आहे. आता या सरकारला हटवण्याची वेळ आली आहे डरो मत असे आवाहन त्यांनी केले. आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी प्रधान यांच्या राजीनाम्याला लोकशाहीचा मोठा विजय असे संबोधले आहे. जंतरमंतरवर विजयी जल्लोष सुरू होता. तिरंगा फडकवत वंदे मातरम्‌च्या घोषणा सुरू होत्या. चक दे इंडियाच्या गीतावर तरुणाई थिरकत होती.

# भारतात बांगलादेश, नेपाळसारखी अराजकता माजवण्याचा डाव!

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

सीजेपी आणि विद्यार्थी आंदोलनाला हायजॅक करण्याचा आणि त्याचे मूळ महत्त्व कमी करून राजकीय फायदा उठवण्याचा राहुल गांधी यांचा 'कुटिल डाव' असल्याचे त्यांच्या नाटकिय प्रदर्शनातून दिसून येत आहे.राहुल गांधी विरोधी पक्ष नेते आहेत,मात्र ते ज्याप्रद्धतीने तरुणांच्या आडून विरोध प्रदर्शन करत तरुणांना भडकत आहे त्यावरून त्यांची भूमिका नेपाळ आणि बांगलादेशमधील अलीकडच्या राजकीय उलथापालथींनंतर, भारतातही तशीच परिस्थिती निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत का, यावर सध्या मोठी चर्चा सुरू आहे.

सीजेपी आणि सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखालील हजारो विद्यार्थी राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर विविध परीक्षांमधील पेपरफुटीविरोधात आंदोलन करत होते. हे आंदोलन महिनाभरापासून शांततेत सुरू होते राहुल गांधी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलनात का सहभागी झाले नाही.? संसदेचे अधिवेशन सुरू असताना राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रियांका गांधी यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी अचानक जंतरमंतरवर जाण्याऐवजी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर (लोककल्याण मार्ग) धरणे आंदोलन सुरू केले. राहुल गांधी यांनी युवा विरोधी पंतप्रधान असा आरोप करत मोदी सरकारवर सडकून टीका केली आहे. त्यांनी पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जप्रकरणी पंतप्रधानांनी माफी मागावी अशी ठाम मागणी केली आहे काँग्रेसने संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये या आंदोलनाचा मुद्दा लावून धरला आहे जंतरमंतरवर आंदोलकांना भेटण्याऐवजी थेट पंतप्रधान निवासाबाहेर आंदोलन केल्यामुळे राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि इतर विरोधी नेत्यांना दिल्ली पोलिसांनी काही काळासाठी ताब्यातही घेतले होते.पण हा त्यांचा राजकीय स्टंट असून सी जे पी आंदोलन हायजाक करण्याचा व तरुणांची सहानुभूती मिळवण्याचा हा कुटिल डाव राहुल गांधी यांचा असून सी जे पी कार्यकर्त्यांनी व तरुणांनी राहुल गांधी यांच्या कुटिल दावा पासून सावध राहायला पाहिजे. राहुल गांधी विद्यार्थ्यांना 'राजकीय हत्यार' म्हणून वापरत असून, मूळ विद्यार्थी चळवळीचे स्वतःच्या फायद्यासाठी राजकीयकरण करत आहेत.

खरं तर काँग्रेसला सत्तेवर यायचे आहे. एन डी ए व मोदी सरकार यांना खूप जड जात आहे येणकेन प्रकारे सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र राहुल गांधी व त्यांचा काँग्रेस पक्ष आखत आहे.देशातील तरुणांची माथे भडकवण्याचे षडयंत्र आखत आहे. भारतात भारताची स्थिती नेपाळ व बांगलादेश सारखी व्हावे असा डाव राहुल गांधी आखात आहे. काँग्रेस पक्ष सत्तेवर येण्यासाठी देशात नेपाळ किंवा बांगलादेशसारखी अराजकता निर्माण करण्याचा आणि लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रधानमंत्री निवासस्थानासमोरील आंदोलन हे काय दर्शवते? नीट-युजी परीक्षा गैरव्यवहाराच्या मुद्यावरून राहुल गांधी आणि इतर विरोधी नेत्यांनी नवी दिल्लीत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन केले होते. उच्च सुरक्षा क्षेत्रात गर्दी जमवून आंदोलनाला हिंसक वळण देणे हे शेजारील देशांमधील (नेपाळ, बांगलादेश) सत्तापालट आंदोलनासारखे होते. राहुल गांधींचे राजकारण हे सरकारला अस्थिर करणारे आणि देशाच्या सुरक्षिततेस बाधा पोहोचवणारे आहे. सत्ताधाऱ्यांचा असा आरोप आहे की, बेरोजगारी किंवा परीक्षांमधील गोंधळासारख्या (उदा. 'नीट' परीक्षा) संवेदनशील मुद्द्यांवर आंदोलने भडकवून देशात अराजकता आणि अस्थिरता निर्माण करण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये थेट संघर्षाचे दृश्ये पाहायला मिळाली.राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी थेट पंतप्रधानांच्या निवासस्थाना बाहेर धरणे आंदोलन केल्याने तणाव वाढला आहे.

सोशल मीडिया आणि जागतिक माध्यमांचा वापर करून भारताची प्रतिमा "असुरक्षित आणि लोकशाहीविरोधी" अशी बनवण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा सरकार कडून केला जातो. विविध आंदोलनांच्या आडून देशात हिंसाचार घडवणे आणि जातीय किंवा धार्मिक सलोखा बिघडवून अस्थिरता निर्माण करणे हा या षडयंत्राचा भाग असल्याचे सत्ताधाऱ्यांचे म्हणणे आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षासोबतच विरोधी पक्षाची भूमिका आणि त्यांची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते. राहुल गांधी यांच्या राजकीय भूमिकेबद्दल आणि त्यांच्या सरकारविरोधातील जबाबदारीबद्दल समाजात आणि राजकीय वर्तुळात दोन मुख्य प्रवाह किंवा दृष्टिकोन पाहायला मिळतात.

राहुल गांधी अनेकदा महत्त्वाच्या मुद्द्यांवर आंदोलन किंवा टीका सुरू करतात, परंतु त्यात सातत्य ठेवत नाहीत. संसदेतील चर्चा किंवा महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांऐवजी ते अनेकदा सोशल मीडिया किंवा तात्पुरत्या विधानांवर जास्त भर देतात, ज्यामुळे त्यांच्या राजकीय गंभीरतेची कमतरता असल्याचा आरोप केला जातो. सरकारच्या निर्णयांवर केवळ दोषारोप करण्यापलीकडे, काँग्रेस पक्ष किंवा ते स्वतः देशासमोर नेमका काय ठोस पर्यायी आराखडा ठेवत आहेत, हे स्पष्टपणे मांडण्यात ते अनेकदा मागे पडतात अशी टीका होते.संसदेचे अधिवेशन किंवा राज्यातील महत्त्वाच्या निवडणुकांदरम्यान त्यांच्या परदेश दौऱ्यांमुळे त्यांच्या राजकीय बांधिलकीवर विरोधकांकडून वारंवार प्रश्न उपस्थित केले जातात.

सरकारच्या धोरणांमुळे देशातील लोकशाही आणि संविधानाला धोका निर्माण होत असल्याचा आवाज उठवून ते आपली विरोधी पक्षाची मुख्य जबाबदारी पार पाडत आहेत, असा त्यांच्या समर्थकांचा दावा आहे.मात्र त्यांच्या विरोधी वक्तव्यात सतत मोदी व आर एस एस. हिंदू विरोधी वक्तव्य जास्त दिसून येत असून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा त्यांचा हेतू दिसून येतो.राहुल गांधी यांच्या भूमिकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन वैयक्तिक राजकीय विचारसरणीवर अवलंबून आहे. एका बाजूला त्यांच्यात विरोधी पक्षनेता म्हणून आवश्यक असलेल्या गांभीर्याचा अभाव दिसतो, तर दुसऱ्या बाजूला ते सरकारविरोधात सर्वात मोठा आणि स्पष्ट आवाज उठवणारे नेते म्हणून पाहिले जातात.

देशात अस्थिरता निर्माण करण्याचा, सरकारला कमकुवत करण्याचा त्यांचा हेतू कधीच साध्य होऊ शकत नाही कारण भारताचे संविधान, भारताची लोकशाही संस्थात्मक रचना, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि निवडणूक यंत्रणा अत्यंत मजबूत आहे, ज्यामुळे नेपाळ किंवा बांगलादेशसारखी थेट अराजकता येथे पसरवणे कठीण राहुल गांधींनी समजून घ्यायला पाहिजे. देशाची सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणा कोणत्याही अंतर्गत किंवा बाह्य धोक्याचा मुकाबला करण्यासाठी सदैव सतर्क असतात. भारताची आर्थिक स्थिती शेजारील देशांच्या तुलनेत अधिक मजबूत आणि स्थिर आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक असंतोष पसरण्याची शक्यता कमी असते.

- ९५६१५९४३०६

# वि. सा. संघाला गर्तेतून बाहेर काढा

**झाडाझडती**



**विनोद देशमुख**
**ज्येष्ठ पत्रकार**

विदर्भातील मराठीभाषी जनतेची, शंभरी ओलांडलेली प्रातिनिधिक साहित्य संस्था विदर्भ साहित्य संघ आता या वयात (खरं म्हणजे सत्तरीपासूनच-१९९२) वादाच्या भोवऱ्यात गरगरत आहे ! त्याचं मूळ आहे नवीन संकुलात, म्हणजे त्याच्या बांधकामात. गेली तब्बल ३४ वर्षे हे संकुल अपूर्ण असल्याचं अर्धवट वापरात आहे. नागपूरच्या मध्यवर्ती बाजारपेठेत, झाशी राणी चौकातील ही नवीन वास्तू सुंदर असेल, असं स्वप्न वि. सा. संघाचे पदाधिकारी, आजीव सदस्य आणि विदर्भातील तमाम मराठीप्रेमी जनतेनं पाहिलं होतं. प्रत्यक्षात ती गैरसोयीचीच झाली आहे.

या ५ मजली इमारतीचे खालचे २ मजले विकासकानं व्यापारी उपयोगासाठी दिलेले आहेत आणि वरचे ३ मजले साहित्य संघाकडे आहेत. तिसऱ्या मजल्यावर पार्किंग ठरलं होतं. ते कधीच झालं नाही ! उलट, तिथं एक सभागृह बांधण्यात आलं आणि उर्वरित जागा रिकामी पडली राहिली. पुढे तिथंही खोल्या बांधल्या. त्याही रिकाम्याच आहेत. चौथ्या मजल्यावर कार्यालय, ग्रंथालय, अमेय दालन हे सभागृह, काही भाडेकरू, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासकक्ष वगैरेमुळे हा एकच मजला साहित्य संघाच्या उपयोगाचा आहे. पाचव्या मजल्यावरील रंगमंदिराला महापालिकेने "ना हरकत प्रमाणपत्र" दिलं नाही. कारण, तेथे पुरेशी अग्निशमन यंत्रणा उभारण्यात आली नाही. अग्निकांड झालं तर पाचवा मजला सर्व बाजूंनी अडचणीचा ठरेल, हाही महत्त्वाचा मुद्दा आहेच. शेवाळकर डेव्हलपर्स या विकासकाशी मूळ करार आणि दोन पूरक/दुरुस्ती करार असे ३ करार होऊनही वि. सा. संघाच्या साहित्य संकुलाची अशी केविलवाणी स्थिती आहे. बांधकामात काही ठिकाणी गुंतागुंत झाल्यामुळे अग्निशमनाची सोय करणं कठिण झालं आहे आणि पार्किंगची व्यवस्था उभारणं तर अशक्यच आहे, असं अनेक बांधकाम तज्ज्ञांचं मत आहे.

नवे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनीही परवाच्या वार्षिक आमसभेत हे स्पष्टपणानं सांगितलं. परंतु, संकुलाची समस्या सोडविण्यासाठी, सरकारकडून लीजवर घेतलेली ही जागा परत करायची, त्याबदल्यात सरकारनं २ एकर जागा नवीन ठिकाणी देऊन साहित्य संकुल बांधून द्यायचं आणि वर वि. सा. संघाला ५० कोटी रुपयांचं अनुदानही द्यावं असा काही तोडगा विचारात असल्याचा आमसभेत न सांगता त्याची घोषणा त्यांनी थेट पत्रपरिषदेत केली आणि याला आमसभेची मान्यता असल्याचंही जाहीर केलं.

मुळात आमसभेत हा विषयच आला नाही, याचा मी स्वतः आणि इतर ७०-८० आजीव सदस्य साक्षीदार आहोत. पर्यायी जागेचा मुद्दाच निघाला नाही.? विश्वस्तांच्या अहवालास आमसभेनं मान्यता दिली, हे खरं. पण त्या अहवालात हा विषय नव्हता.? हा अहवाल सरचिटणीस विलास मानेकर यांनी शब्दशः वाचून दाखविला. त्यात कुठेही लीज सरेंडर, २ एकर, नवीन जागा, सरकारनं बांधून देणं, ५० कोटी अनुदान असा कुठलाही उल्लेख नव्हता. मग, या प्रस्तावाला आमसभेची मान्यता असल्याचं गिरीश गांधी कसं काय म्हणाले? तेच सांगू शकतील !

वि. सा. संघात त्रिस्तरीय कार्यपद्धती आहे. अध्यक्षासह कार्यकारिणी, विश्वस्त मंडळ आणि आमसभा. वि. सा. ३ विश्वस्त असतात. त्यामुळे मालमत्तेसंबंधीचा कुठलाही महत्त्वाचा विषय कार्यकारिणीनं मंजूर केला तरी तो मान्यतेसाठी विश्वस्त मंडळापुढे न्यावा लागतो आणि नंतर त्यावर आमसभेचं शिक्कामोर्तब आवश्यक असतं. याप्रकरणात पहिल्या दोन मान्यता झाल्या असल्याचं दिसतं. मात्र, आमसभेची मोहोर त्यावर उमटलेली नाही, हे मी ठामपणानं सांगू शकतो. ती प्रक्रिया पूर्ण करा आणि मग रीतसर काय ते करा ना!

वरील योजनेला आमचा विरोध आहे, असा याचा अर्थ मुळीच नाही. उलट, तीन तपाच्या नकारात्मक 'तपश्चर्ये'तून वि. सा. संघाला बाहेर काढण्याचा एक चांगला मार्ग या योजनेतून समोर आला आहे. वि. सा. संघाचे माझ्यासारखे अनेक चाहते याचं स्वागतच करतील. फक्त, ते तेवढं आमसभेचा होकार घेणं? व्यवस्थितच व्हायला पाहिजे. आमसभा ही सर्वोच्च प्राधिकारिणी असते. तिला डावलण्यात आल्याचं गालबोट चांगल्या कामाला लागू नये, असं आमच्यासारख्या वि. सा. संघप्रेमींना वाटतं. म्हणूनच याप्रकरणी गिरीशभाऊंनी खुलासा करावा आणि आजीव सदस्यांच्या मनातील शंका दूर करून वि. सा. संघाला स्वतःचं हक्काचं, चांगलं नवीन घर मिळवून द्यावं, अशी सर्व संबंधितांना प्रार्थना.

- ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

# टि २० मालिकेत भारताचा झिंबाब्वेला प्रथमच व्हॉईटवॉश

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारतीय संघाने तिसऱ्या टी२० सामन्यात झिम्बाब्वेचा ३५ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने आपल्या २० षटकांत पाच गडी गमावून १९२ धावा केल्या. प्रत्युत्तरात, झिम्बाब्वेला आपल्या २० षटकांत सात गडी गमावून केवळ १५७ धावाच करता आल्या. अशाप्रकारे, भारताने झिम्बाब्वेवर ३-० ने क्लीन स्वीप पूर्ण केला. श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदाखाली भारताचा हा पहिला टी२० मालिका विजय आहे. यापूर्वी, त्याच्या कर्णधारपदाखाली भारताला आयर्लंड आणि इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला होता.

**भारतीय गोलंदाजांचे झिम्बाब्वेवर वर्चस्व**

लक्ष्याचा पाठलाग करताना, संघ खेळपट्टीवर झिम्बाब्वेला खूप संयमाने फलंदाजी करणे आवश्यक होते, परंतु त्यांचे फलंदाज तसे करण्यात अपयशी ठरले. मागील सामन्यांप्रमाणेच, झिम्बाब्वेने सुरुवातीच्या षटकांमध्ये अनेक गडी गमावले आणि पॉवरप्लेचा फायदा उठवण्यात ते अपयशी ठरले. वेगवान गोलंदाज यश ठाकूरने चौथ्या षटकात डायन मायर्स आणि कर्णधार सिकंदर रझा यांना सलग चेंडूंवर बाद करून यजमान संघाची अवस्था ३४ धावांवर तीन गडी अशी केली. भारतीय खेळाडूंनी खराब क्षेत्ररक्षण केले, चार झेल सोडले आणि काही चौकार दिले, तरीही बर्लने आत्मविश्वासाने खेळी केली आणि वेस्ली मधेवेरेसोबत पाचव्या विकेटसाठी ६० धावांची भक्कम भागीदारी केली. झिम्बाब्वेच्या खेळाडूंनी मैदानाच्या सर्व बाजूंनी काही जोरदार फटके मारले, पण सुरुवातीच्या पराभवातून सावरणे कठीण होते.

**झिम्बाब्वेसाठी बर्लचे अर्धशतक**

झिम्बाब्वेची फलंदाजी लक्ष्याचा पाठलाग करताना खराब होती, पण रायन बर्लने जोरदार कामगिरी करत अर्धशतक झळकावले. तथापि, त्याचे अर्धशतकही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाही. बर्ल ४३ चेंडूंमध्ये पाच चौकारांसह ५४ धावांवर नाबाद राहिला. वेस्ली मधेवेरेने २८ आणि बेन करनने २० धावा केल्या. भारताकडून मयंक यादवने तीन, तर यश ठाकूरने दोन बळी घेतले. अशोक शर्मा आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

**वैभव सूर्यवंशीची दमदार कामगिरी**

यापूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सूर्यवंशीने सावकाश सुरुवात केली आणि पहिल्या १० चेंडूंमध्ये केवळ ११ धावा केल्या. त्यानंतर त्याने पुढच्या १० चेंडूंमध्ये १५ धावा केल्या आणि अखेरीस ३१ चेंडूंमध्ये आपले दुसरे टी२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक पूर्ण केले. अपेक्षेप्रमाणे, सूर्यवंशीच्या खेळीत काही शानदार फटके पाहायला मिळाले. दरम्यान, त्याचा सलामीचा साथीदार, अभिषेक शर्मा, सलग सहाव्यांदा कमी धावसंख्येवर बाद झाला. तथापि, सूर्यवंशीने लक्षणीय परिपक्वता दाखवत ईशान किशन (२९) सोबत दुसऱ्या विकेटसाठी ७५ धावांची भागीदारी केली. त्यानंतर त्याने कर्णधार श्रेयस अय्यर (२७) सोबत पुढच्या विकेटसाठी ५० धावांची भागीदारी केली. मात्र, सूर्यवंशी शतक पूर्ण करण्याच्या अगदी जवळ असताना बाद झाला.

भारताच्या डावात, इशान किशनने २९, कर्णधार श्रेयस अय्यरने २७ आणि रिंकू सिंगने २५ धावा केल्या. तिलक वर्मा ११ धावांवर नाबाद राहिला. झिम्बाब्वेसाठी ब्रॅड इव्हान्सने दोन बळी घेतले, तर सिकंदर रझा, ब्लेसिंग मुझारबानी आणि वेस्ली माधेवेरे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

**सूर्यवंशीचा वैभवविलास**

सामनावीर आणि मालिकावीर म्हणून गौरवल्यानंतर, युवा भारतीय फलंदाज वैभव सूर्यवंशीने हे स्वप्न सत्यात उतरल्यासारखे असल्याचे म्हटले आणि त्याला त्याचा नैसर्गिक टी२० खेळ खेळण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन दिल्याबद्दल संघ व्यवस्थापनाचे आभार मानले. सूर्यवंशीने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेत तीन डावांमध्ये ५०.३३ च्या सरासरीने १५१ धावा केल्या.

पहिल्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात, या डावखुऱ्या फलंदाजाने अवघ्या १९ चेंडूंमध्ये धमाकेदार अर्धशतक झळकावले. तिसऱ्या सामन्यात, त्याने संयमाने फलंदाजी करत ४९ चेंडूंमध्ये ८१ धावा केल्या आणि भारताने झिम्बाब्वेवर ३-० ने क्लीन स्वीप मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**वैभव प्रशिक्षक, कर्णधार आणि संघाबद्दल काय म्हणाला?**

सामन्यानंतर सूर्यवंशी म्हणाला, "मला खूप छान वाटत आहे. माझ्यासाठी हे स्वप्न सत्यात उतरल्यासारखे आहे. मला माझे पहिले 'प्लेअर ऑफ द मॅच' आणि 'प्लेअर ऑफ द सिरीज' पुरस्कार मिळाले आहेत. माझी येथील तयारी उत्कृष्ट झाली आहे. प्रशिक्षक, कर्णधार आणि संपूर्ण संघाने मला पूर्णपणे पाठिंबा दिला आहे." मी माझा नैसर्गिक टी-२० खेळ खेळण्याचा प्रयत्न केला. संघाला चांगली सुरुवात करून देणे हे माझे नेहमीच ध्येय असते आणि जर मला चांगली सुरुवात मिळाली, तर मी मोठी खेळी करण्याचा प्रयत्न करतो. मी येथे १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेतही खेळलो आहे आणि मला येथे फलंदाजी करायला आवडते. मी सरावात जे करतो, तेच सामन्यात करण्याचा प्रयत्न करतो.

**कर्णधार श्रेयस संघाच्या कामगिरीवर समाधानी**

भारतीय कर्णधार श्रेयस अय्यर देखील संघाच्या विजयावर खूप समाधानी होता. त्याच्या कर्णधारपदाखाली भारताचा हा पहिला टी-२० मालिका विजय आहे. झिम्बाब्वे दौऱ्यापूर्वी भारताने आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध टी-२० मालिका गमावल्या होत्या. श्रेयस म्हणाला, "हे तरुण खेळाडू खूप निर्भयपणे खेळतात. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा आणि सकारात्मक दृष्टिकोन आहे. कर्णधार म्हणून, मला खेळाडूंकडून त्याच ऊर्जेची अपेक्षा असते आणि ती मला या मालिकेत दिसली. हा एक विशेष विजय आहे. आम्ही खूप व्यावसायिकपणे खेळलो आणि ३-० ने जिंकलो, त्यामुळे हा विजय खूप खास आहे."

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्हेंत प्रकाश चव्हाण, अव्हेंत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# डीपीसी बैठकीत आ. विकास ठाकरे यांनी उघड केले दोन नवे घोटाळे

## नागपूर महापालिकेच्या कचरा कंत्राटदारांचा समावेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा नियोजन समिती च्या आज झालेल्या बैठकीत पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी नागपूर महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित आणखी दोन गंभीर घोटाळ्यांचा गौप्यस्फोट करत AG Enviro, BVG आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली.

आमदार ठाकरे यांनी बैठकीत सांगितले की, नोव्हेंबर २०१९ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत निकृष्ट कामगिरी, करारभंग आणि विविध अनियमितता करूनही AG Enviro U BVG India या दोन्ही कंत्राटदारांना मुदतवाढ देण्यात आली. याच मुदतवाढीचा गैरफायदा घेत आता नव्या प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

**पहिला घोटाळा : ठिय्या मजुरांची बेकायदेशीर नियुक्ती**

आमदार ठाकरे यांनी निदर्शनास आणून दिले की, करारातील अटी आणि कामगार कायद्यांनुसार नियमित कामगारांची नियुक्ती करणे बंधनकारक असताना, दोन्ही कंत्राटदार ऑटो-टिपर, जेसीबी, कंटेनर तसेच Garbage Transfer Stations येथे मोठ्या प्रमाणावर ठिय्या मजुरांकडून काम करून घेत आहेत. ही नियुक्ती करारातील अटी व कामगार कायद्यांचे उघड उल्लंघन असूनही नागपूर महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई न करता कंत्राटदारांना संरक्षण दिल्याचा आरोप त्यांनी केला.

**दुसरा घोटाळा : एका कचऱ्याचे दोनदा वजन करून आर्थिक गैरव्यवहार**

आमदार ठाकरे यांनी बैठकीत आणखी एक धक्कादायक प्रकार उघड केला. त्यांनी सांगितले की, सायंकाळी भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथील वजनकाट्यावर वजन झाल्यानंतर काही कंटेनरमधील कचरा डम्पिंग यार्डमध्ये न टाकता शेजारील पार्किंग यार्डमध्येच ठेवण्यात येतो. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच कंटेनरचे पुन्हा वजन करून त्यानंतर कचरा डम्पिंग यार्डमध्ये टाकला जातो. काही कचरा वाहतूक कंटेनर्स वजनकाट्यावर वजन करून झाल्यानंतर संध्याकाळच्या वेळी पार्किंग यार्डमध्ये कचरा उतरवतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी हाच कचरा पुन्हा ट्रकमध्ये भरून वजनकाट्यावर नेला जातो आणि त्याचे पुन्हा वजन केले जाते. त्यामुळे त्याच कचऱ्याचे दोन वेळा वजन करून नागपूर महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

आमदार ठाकरे यांनी सांगितले की, नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दोन्ही कंत्राटदारांचे करार रद्द करण्याचा ठराव मंजूर करूनही संबंधित अधिकऱ्यांनी संगनमताने त्यांना मुदतवाढ दिली. त्यामुळे आजही नव्या स्वरूपातील घोटाळे सुरू असून त्याचा फटका नागपूरकरांच्या पैशाला बसत आहे.

त्यांनी याचीही आठवण करून दिली की, महाराष्ट्र विधानसभेत त्यांनी दोन वेळा AG Enviro आणि BVG India या दोन्ही



कंत्राटदारांविरोधात आवाज उठविला होता. त्यावेळी नगरविकास राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ यांनी सभागृहात संबंधित कंत्राटदारांचे कंत्राट रद्द करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजतागायत या प्रकरणात कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नसल्याबद्दल आमदार विकास ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीत आमदार विकास ठाकरे यांनी AG Enviro आणि BVG India यांचे करार तात्काळ रद्द करणे, दोन्ही कंपन्यांना काळ्या यादीत टाकणे, डम्पिंग यार्डलगतचे पार्किंग यार्ड तातडीने हटविणे, स्वतंत्र विभागामार्फत कामगारांची नियमित तपासणी करणे, दोन्ही घोटाळ्यांप्रकरणी संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर मोठा आर्थिक दंड आकारणे तसेच संबंधितांविरुद्ध एफआयआर दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

**जिल्हा नियोजन समिती बैठकीत आमदार विकास ठाकरे यांनी उपस्थित केलेले इतर मुद्दे**

१) दाभा येथील झुडपी जंगलासाठी आरक्षित जमिनीवर प्रदर्शन व वाणिज्यिक केंद्रासाठी ले-आऊट व बांधकाम परवानगी मंजूर केल्याप्रकरणी नागपूर सुधार प्रन्यासाविरुद्ध कारवाई तसेच नागपूर सुधार प्रन्यासाशी संबंधित आणखी १४ महत्त्वाच्या मुद्द्यांवर कारवाईची मागणी.

२) संत ज्ञानेश्वर नगर, राज नगर, ताज नगर व आदर्श नगर (झिंगाबाई टाकळी) येथील झोपडपट्टीधारकांचे MHADA, NIT व नागपूर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांमध्ये तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी.

३) ठोक निधी अंतर्गत निविदांमध्ये झालेल्या बचत रकमेचा उपयोग नवीन विकासकामांसाठी करता यावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना मंजुरीचे अधिकार देण्याची मागणी.

४) डिलीशन कमिटीच्या शिफारशींची अंमलबजावणी व विकास आराखड्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी.

५) ७०० चौ. फूटपर्यंतच्या निवासी मालमत्तांना मालमत्ता करातून सवलत देण्याची मागणी.

६) मेयो रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाच्या कामांतील निकृष्ट दर्जा व अनियमिततांप्रकरणी संबंधित अधिकारी व दोषी कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी.

७) जिल्हा रुग्णालय, मानकापूर येथे ऑपरेशन थिएटर, शवविच्छेदन कक्ष व इतर वैद्यकीय सुविधा सुरू करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ मंजूर करून अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी.

८) मेयो रुग्णालयातील वैद्यकीय तपासणीदरम्यान आरोपीला पळून जाऊ दिल्याप्रकरणी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी.

## राशन कार्यालयातील सर्व्हर समस्येमुळे नागरिक त्रस्त, शिवसेनेचे अन्न व नागरी पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या रेशन कार्ड कार्यालयांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या सर्व्हर समस्येमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रणीत महाराष्ट्र शिव माथाडी कामगार सेने च्यावतीने अन्न व नागरी पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, नवीन रेशन कार्ड काढणे, कुटुंबातील सदस्यांची नावे समाविष्ट करणे, माहितीतील दुरुस्ती, ई-केवायसी तसेच इतर विविध कामांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागते. मात्र, कार्यालयातील ऑनलाइन सर्व्हर सतत बंद पडत असल्याने किंवा तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने अनेक तास प्रतीक्षा करूनही कामे होत नाहीत. परिणामी नागरिकांना पुन्हा पुन्हा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून त्यांचा वेळ आणि आर्थिक नुकसान होत आहे. विशेषतः दक्षिण नागपूर, हुडकेश्वर रोड तसेच शहराच्या दूरवरच्या भागांतून सिव्हिल लाईन्स येथील अन्न व नागरी पुरवठा कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचा संपूर्ण दिवस वाया जात आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगार व गरीब कुटुंबांची दिवसाची मजुरी बुडत असून, त्यांच्यात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन ऑनलाइन सर्व्हर कायमस्वरूपी सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच नागरिकांना वेळेत व विनाअडथळा सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे केली. यावेळी सिद्धेश्वर (सिद्धू) कोमजवार, मन्नू दत्ता, मुन्नाजी महाजन, राठीजी, ललित नायडू, दीपक पोहणेकर, उपाध्येयजी, मनोज कुहीकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## १ ऑगस्टला आरक्षणाचे उपवर्गीकरण जाहीर करा

**लातूर :** अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण व्हावे आणि मुख्य प्रवाहाबाहेर असलेल्या ५९ जातींना आरक्षणाचा न्याय मिळावा, या मागण्यांसाठी अनुसूचित जाती (एससी) उपवर्गीकरण समर्थन समिती लातूर जिल्ह्याच्या वतीने दि. २७ जुलै रोजी दुपारी १२.१५ वाजता लातूर शहरात महामोर्चा काढण्यात आला. समाजाच्या भावना आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी येत्या १ ऑगस्ट रोजी आरक्षणाचे उपवर्गीकरण जाहीर करावे अन्यथा येत्या काळात राज्यातील मातंग समाज एकत्र येऊन निवडणुकीत मतांच्या माध्यमातून उत्तर देईल, असा इशारा मातंग समाजाच्या वतीने महामोर्चातून देण्यात आला. अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण व्हावे या प्रमुख मागणीसाठी काढण्यात येणाऱ्या महामोर्चाची जय्यत तयारी अनुसूचित जाती (एससी) उपवर्गीकरण समर्थन समिती लातूरच्या वतीने गेल्या एक महिन्यापासून सुरु होती. त्यामुळे सोमवारी अगदी सकाळपासूनच मातंग समाजबांधव लातूर शहरातील गंजगोलाई परिसरातील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुणार्कृती पुतळ्याच्या परिसरात जमत होते. चारचाकी वाहनांनी संपूर्ण जिल्ह्यातून मातंग समाजबांधव महामोचार्साठी आले होते.

## गावालगत श्मशानभूमीच्या प्रस्तावाला ग्रामस्थांचा विरोध

### गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांची पर्यायी जागेची मागणी, तहसीलदारांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

गोसेखुर्द प्रकल्पामुळे पुनर्वसित झालेल्या गाडेघाट-घाटउमरी येथील गावालगत श्मशानभूमी उभारण्याच्या प्रस्तावाला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला असून, लोकवस्तीपासून दूर स्वतंत्र पयार्यी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने सोमवारी तहसीलदार संजय राठोड यांना निवेदन सादर केले.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गाडेघाट व घाटउमरी या दोन्ही गावांचे गोसेखुर्द प्रकल्पामुळे तास कॉलनी परिसरात पुनर्वसन करण्यात आले. त्यावेळी दोन्ही गावांसाठी स्वतंत्र श्मशानभूमीची जागा राखीव ठेवणे अपेक्षित होते. मात्र, सध्या गावाच्या हद्दीलगत आणि लोकवस्तीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावरील चराईसाठी राखीव जमिनीवर श्मशानभूमी उभारण्याचा प्रस्ताव पुढे आणण्यात आला आहे.

प्रस्तावित जागा लोकवस्तीच्या अत्यंत जवळ असल्याने भविष्यात नागरिकांना सामाजिक, पर्यावरणीय तसेच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अडचणी निर्माण होऊ शकतात, असा दावा ग्रामस्थांनी निवेदनात केला आहे. त्यामुळे चराईची जमीन अबाधित ठेवून श्मशानभूमीसाठी गावापासून सुरक्षित अंतरावरील स्वतंत्र जागेची निवड करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या निवेदनाची प्रत गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव यांनाही देण्यात आली. यावेळी उपसरपंच प्रियंका रवी गेडाम, ग्रामपंचायत सदस्य मनिषा रेपाडे, ललिता मांढरे, किसन शेंदरे, प्रल्हाद शेंदरे, नरेंद्र मेश्राम, दिपाली गायकवाड, कुसुम मेश्राम, प्रकाश इंगळे, विद्या मेश्राम, मुन्ना इंगळे, मंगेश रेहपाडे, संदीप अंबाडेरे, सोपान मेश्राम यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत प्रशासनाने प्रस्तावाचा फेरविचार करून श्मशानभूमीसाठी पयार्यी जागा निश्चित करावी, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

## नागपूर सुधार प्रन्यासातील कथित अनियमिततेची चौकशीची मागणी, शिवसेनेचे सभापतींना निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) च्या पूर्व विभागातील कथित अनियमितता, इमारत बांधकाम परवानगी, आरएल डिमांड प्रकरणे तसेच गुठेवारी विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) नागपूर शहर जिल्हाप्रमुख गौरव रामकुमार गुप्ता यांनी नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय



मीना यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात पूर्व विभागातील विविध प्रकरणांमध्ये गंभीर स्वरूपाच्या अनियमितता, दिरंगाई आणि मनमानी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वाठोडा परिसरातील एका बांधकाम परवानगी प्रकरणात आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही मंजुरी प्रक्रियेत अडथळे निर्माण करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच 'कॉमन वॉल'चे कारण पुढे करून मंजूर बांधकाम परवाना रद्द करण्यात आल्याच्या प्रकरणाचीही निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, वाठोडा परिसरातील काही सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या ले- आऊटसाठी आर एल डिमांड देने बंद करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. हा निर्णय कोणत्या नियम अथवा शासन आदेशानुसार घेण्यात आला, याची अधिकृत माहिती नागरिकांसमोर जाहीर करावी. तसेच संबंधित ले- आऊट कोणत्या आरक्षणासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत, याबाबतही स्पष्टता देण्याची मागणी करण्यात आली आहे.

गुंठेवारी विभागातील काही अधिकारी व कर्मचारी नागरिकांशी उद्धट वर्तन करत असून, विनाकारण फायली प्रलंबित ठेवून नागरिकांना त्रास दिला जात असल्याचाही आरोप निवेदनात केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र प्रशासकीय चौकशी करून संबंधित कार्यकारी अधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून नागरिकांना न्याय द्यावा, अन्यथा नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना पदाधिकारी निरंजन दहीवाले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

थोडक्यात

## कारगिल शहीदांना सैनिक स्कूल चंद्रपूरमध्ये मानवंदना



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर .**

कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर जवानांच्या शौर्य, पराक्रम आणि सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करत सैनिक स्कूल चंद्रपूर येथे रविवारी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात शाळेचे प्राचार्य कॅप्टन (भारतीय नौदल) अश्विन अनुपदेव, उपप्राचार्य लेफ्टनंट कर्नल रुबी दीक्षित, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कमांडर रजत जी, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि सर्व कॅडेट्स उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेतील बॅटल ऑनर मेमोरियल येथे प्राचार्य कॅप्टन अश्विन अनुपदेव यांनी पुष्पचक्र अर्पण करून कारगिल युद्धातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर कॅडेट्सनी औपचारिक मानवंदना देत देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर सैनिकांप्रती आदर व्यक्त केला.

यावेळी कारगिल युद्धातील शौर्यगाथांचा आढावा घेत भारतीय सशस्त्र दलांच्या धैर्य, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेचा गौरव करण्यात आला. कॅडेट्सना राष्ट्रप्रेम, शिस्त, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभाव ही मूल्ये अंगीकारून देशसेवेसाठी स्वतःला सदैव तयार ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. देशाच्या संरक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या सैनिकांचे बलिदान कधीही विसरता येणार नाही, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रम देशभक्तीच्या घोषणांनी आणि शहीदांविषयीच्या कृतज्ञतेच्या भावनेने भारावून गेला.

## ५ वर्षीय अरहंत थुलने रचला इतिहास, उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्यासाठी राष्ट्रीय सन्मान




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अवघ्या ५ वर्षांच्या अरहंत नितेश थुल याने आपल्या असामान्य ज्ञानसंपदा आणि प्रभावी वक्तृत्व कौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत इतिहास रचला आहे. त्याला "oungest Knowledge Wizard with Remarkable Public Speaking Skills" या प्रतिष्ठित राष्ट्रीय सन्मानाने गौरविण्यात आले. हा बहुमान केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरात आयोजित भव्य पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे अरहंतच्या विलक्षण प्रतिभेची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अडीच वर्षांच्या कोवळ्या वयापासून अरहंतने सार्वजनिक व्यासपीठावर बोलण्यास सुरुवात केली. आज तो सामाजिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी विषयांवर आत्मविश्वासाने प्रभावी भाषणे देत असून आपल्या वयातील मुलांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरत आहे. अरहंतच्या या यशामुळे नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध क्षेत्रांतून त्याचे व कुटुंबियांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## 'रक्तात आहे राष्ट्रभक्ती, शुभेच्छा देऊ रक्तदानातून, चला विक्रमी मतदान

**करूया'अशा घोषणा देत निमखेडा येथे भाजपाच्या ६६ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा**



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

चाचेर मंडळ अंतर्गत येत असलेल्या निमखेडा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संपूर्ण राज्यात सुरू असलेल्या वाढदिवसमहोत्सवानिमित्त निमखेडा येथे नागपूर रामदास पेठ येथील धीरज खरवडे यांची लाईफ लाईन ब्लड बँक रक्तपेढी यांच्या सहकार्याने रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कडून नुकतेच शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी' रक्तात आहे राष्ट्रभक्ती, शुभेच्छा देऊ रक्तदानातून, चला विक्रमी रक्तदान करूया' अशा घोषणा देत ६६ भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदानाने मुख्यमंत्री फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी भाजपा मौदा तालुका चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण, पंचायत समिती माजी उपसभापती खेमराज चाफले, किसान आघाडी महामंत्री तथा सरपंच संकेत झाडे, माजी सरपंच आनंद लेंडे, महामंत्री चांगदेव येळणे, अशोक बावनकुळे, मंगेश चाफले, सुरेश भिलकर, उमेश शेंडे, आकेश पानतावणे, सिन्नु बुरूपपल्ली, लीलाधर घाटबांधे, महेंद्र दोरखंडे, प्रल्हाद रंधई ,कमलेश महादुले, रंजीत येळणे, सुरेश येळणे, दिनेश भुजाडे, कल्पना घाटबांधे, नेहा शेंडे उपस्थित राहून रक्तदानाने मुख्यमंत्री फडणवीस यांना आगळ्यावेगळ्या शुभेच्छा दिल्या.

थोडक्यात

## गुरुपौर्णिमेनिमित्त जामसावळी धामात उसळणार भक्तीचा महासागर



**दै. सिंहवाणी वृत्त, सौंसर**

चमत्कारिक श्री हनुमान मंदिर (हनुमान लोक) जामसावळी येथे २८ व २९ जुलै रोजी दोन दिवसीय गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा गुरुपौर्णिमेनिमित्त ३ लाखांहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन मंदिर ट्रस्ट आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे व्यापक नियोजन केले आहे. जिल्हाधिकारी नीरज कुमार वशिष्ठ आणि पोलीस अधीक्षक प्रकाशचंद्र परिहार यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत सुरक्षा, दर्शन व्यवस्था, आरोग्य सेवा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहनतळ, वाहतूक, महाप्रसाद, आपत्कालीन सेवा तसेच इतर आवश्यक सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांचे अधिकारी आणि ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

मंदिर संस्थानचे अध्यक्ष गोपाल शर्मा यांनी सांगितले की, भाविकांना सुरळीत आणि सुलभ दर्शन मिळावे यासाठी विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. मंदिर परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात येणार असून दर्शन रांग व्यवस्थापन, गर्भगृहातील व्यवस्था, स्वच्छता तसेच पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला जाणार आहे. दोन दिवसीय महोत्सवानिमित्त २८ जुलैच्या सायंकाळी प्रसिद्ध भजन गायकांच्या उपस्थितीत भव्य भजन संध्या व भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तर २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या मुख्य दिवशी श्री हनुमान यांच्या श्रीमूर्तिचा विशेष अभिषेक, पूजन, महाआरती तसेच भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात येईल. देशातील विविध राज्यांतून मोठ्या संख्येने भाविक जामसांवली धामात येऊन श्री हनुमानांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त करणार आहेत. रेल्वेमार्गाने येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मंदिर ट्रस्टतर्फे सौसर रेल्वे स्थानकापासून जामसावळी धामापर्यंत मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मंदिर संस्थानने सर्व भाविकांना प्रशासन आणि ट्रस्टच्या व्यवस्थेला सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, गुरुपौर्णिमेचा हा पवित्र महोत्सव श्रद्धा, भक्ती आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न व्हावा यासाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली असल्याचे सांगितले आहे.

## नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे नवीन शहरबस फीडर सेवेचे लोकार्पण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे उज्वल नगर मेट्रो स्टेशन ते शाहूनगर (मनीषनगर मार्गे) या नवीन शहरबस फीडर सेवेचे लोकार्पण आज, दि. २७ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाले. या सेवेचे लोकार्पण मंगला खेकरे, सभापती (परिवहन), नागपूर महानगरपालिका यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजीव घाटोळे (व्यवस्थापक ऑपरेशन), गजानन नागूलवार ( व्यवस्थापक प्रशासन), महेश मोरोणे ( संयुक्त महाव्यवस्थापक, महामेट्रो) तसेच सुधाकर उराडे, महाव्यवस्थापक, ओ एंड एम , चलो मोबिलिटीचे अधिकारी व परिसरातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

मेट्रो व शहरबस सेवेमध्ये प्रभावी समन्वय साधून नागरिकांना पर्यावरणपूरक, जलद, सुरक्षित व अखंड सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे हा या फीडर सेवेचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमामुळे मेट्रो स्थानकापर्यंत नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होऊन सार्वजनिक वाहतुकीच्या वापराला चालना मिळणार आहे.

## श्रीवासनगर महादुला येथील एनसीएमसी बस सवलत कार्ड आणि एस. आय आर शिबिरात नागरिकांचा उदंड प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महादुला नगरपंचायत क्षेत्रातील श्रीवासनगरमध्ये काल दुपारी ११ ते ३ वाजता पर्यंत एनसीएमसी कार्ड तयार करणे आणि शासनाची एसआयआर शिबिरचे आयोजन गोडबोले चौक आपले कार्यालयात झालेल्या शिबिरात १४६ नागरिकांनी एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केली आणि एसआयआर फॉर देखील भरला.

या कार्यक्रमाला महादुला नगरपंचायतच्या नगराध्यक्षा हेमलता मनोज सावजी, सामाजिक कार्यकर्ते मनोज सावजी भाजपाध्यक्ष, महादुला सचिन पाटील, भाजपा गटनेते अभिजित ढेंगरे, नगरसेवक प्रीतम लोहसारवा, नगरसेवक मोसिन शेख अजय सोलंकी, नगरसेविका नंदा तुरक, स्वाती पटले, सोनू उघडे, कोराडी महिला मंडळ अधीक्षक सविता जिचकार, रोशनी कटरे, सीमाताई कथाने, आँचल घरडे, माजी नगरपंचायत अध्यक्ष कल्पना जैस्वाल, ज्योती गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व बूथप्रमुखआणि कार्यकर्त्यांनी सहयोग केला.

# सुविधांची पडताळणी होईपर्यंत फ्लॅट्सची नोंदणी स्थगित

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत महानगराच्या विकासकामांचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वाढत्या महानगराच्या विस्तारात ज्या निकषावर उंच इमारतींना व फ्लॅटस योजनांना परवानगी दिली त्याची पूर्तता संबंधितांनी केली किंवा नाही याची पडताळणी झाली पाहिजे. ही पडताळणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कोणत्याही फ्लॅटसची पुढील आदेशापर्यंत नोंदणी करू नका, असे सक्त आदेश महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत महानगरातील विकास योजनांना चालना देण्यासाठी जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री. अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, प्रा. संजय भेंडे, डॉ. राजीव पोतदार, डॉ. नितीन राऊत, मोहन मते, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, विकास ठाकरे, मनपाच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, आयुक्त डॉ. विपीन, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्री. अंकित, श्री. मुरुगानंथम एम, श्री. मिलिंद मेश्राम यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मनपा आणि निरी यांच्यात शहरातील प्रदुषण निर्मुलनासाठीचा सामंजस्य करार पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महापौर श्रीमती निता ठाकरे मनपा आयुक्त डॉ.विपीन, निरीचे संचालक एस.वेंकटमोहन, अधीक्षक अभियंता डॉ.श्वेता बॅनर्जी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत डीपीडीसी निधीतून प्राप्त लॉग ब्रूम जेसीबीचे लोकार्पण करण्यात आले. नदी व नाले स्वच्छतेसाठी याचा उपयोग केला जाणार आहे.

उंच इमारती, अपार्टमेंटस यांची संबंधितांना आक्युपन्सी सर्टिफिकेट अर्थात भोगवटा प्रमाणपत्र देताना सुरक्षिततेसह पायाभूत सुविधेच्या दृष्टीने अनेक बाबींचा यात अंतर्भाव असतो. तथापी एकदा असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अनेक भागात काही बिल्डर्सनी सांडपाणी, मलनिःसारण, अग्निशमन व इतर आवश्यक पायाभूत व्यवस्था केली नसल्याने याचा ताण त्या-त्या भागात मर्यादित असलेल्या सुविधेवर पडला आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले असून याबाबत आ. प्रवीण दटके, आ. डॉ. नितीन राऊत, आ. विकास ठाकरे, अभिजित वंजारी, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी व इतर मान्यवर सदस्यांनी बैठकीत प्रश्न उपस्थित करून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे लक्ष वेधले. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना वस्तुस्थिती विचारून जोपर्यंत शासन निर्णयाप्रमाणे सर्व सुविधांची पूर्तता होत नाही तोपर्यंत आक्युपन्सी सर्टिफिकेट वितरित झालेच कसे असा प्रश्न विचारून याची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले.

याबाबत सात दिवसाच्या आत सर्व वस्तुस्थिती सादर करण्याचे महानगरपालिकेला निर्देश देऊन कोणत्याही फ्लॅटसची पुढील आदेश होईपर्यंत जिल्ह्यात कुठेही नोंदणी होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा उपनिबंधकांना दिले.

**शासकीय जागांवर झालेले अतिक्रमण तत्काळ हटवा**

नागपूर शहरात व अन्य ठिकाणी महसूल, महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास यांच्या व अन्य शासकीय जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी आता कायदेशीर जबाबदारी त्या त्या विभागातील सहाय्यक आयुक्तांवर राहील. शासकीय जागा एखाद्या संस्थेला हस्तांतरित करताना नियम व अटी व शर्तींच्या आधारे त्या हस्तांतरित केलेल्या असतात. या अटी व शर्तीचा भंग करून जर कुणी परस्पर मोकळ्या जागेवर कब्जा केलेला असेल अशा संस्था व लोकांविरुध्द तत्काळ कारवाई करून अशा अतिक्रमणातून जागा मुक्त करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपा आयुक्त व जिल्हाधिकारी यांना दिले. यात एक जानेवारी २०११ च्या पूर्वी ज्यांचे असतील ती शासन निर्णयाप्रमाणे वगळले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**तर नागपूर महानगरपालिकेचे पाणी बंद का करू नये**

अल निनो व वातावरणातील बदलामुळे पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. नागपूर व शेजारील भंडारा जिल्ह्यात धानाची अजुनही लावणी झालेली नाही. पावसाचा ताण वाढल्यास ज्या ठिकाणी पेरणी झाली आहे त्याठिकाणी पिके तरतील कसे, याचे आव्हान आहे. पाण्याची स्थिती लक्षात घेता महानगरपालिकेच्या पाणी वितरणात सुमारे ५० टक्के पाण्याची चोरी ही परवडणारी नाही. अनेक आस्थापनांना जे पाणी दिले जात आहे तिथे ही चोरी असून येत्या तीन दिवसात युद्धपातळीवर हे पाणी चोरी रोखण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपाच्या पाणीपुरवठा विभागाला दिले. जे पाणी चोरत आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यास त्यांनी सांगितले.

**घनकचऱ्याच्या चोख व्यवस्थापनासाठी झोननिहाय कामाचे वाटप**

शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी कचरा उचलण्याचे काम ज्या अटी व शर्तींवर बीव्हीजी, एजी एन्विरो कंपनीला देण्यात आले आहे त्याची पूर्तता होते किंवा कसे याची शहानिशा व वेळोवेळी पडताळणी झाली पाहिजे. अनेक भागात कचरा व्यवस्थापनाबाबत तक्रारी असून जर संबंधित कंपनी कामात कसूर करीत असेल तर संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यासाठी मनपा पुढे का येत नाही, असा सवाल पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. केवळ दंड आकारून झालेले नुकसान भरता येणार नाही. स्वच्छतेच्या मानांकनात सर्व क्षमता असूनही केवळ कंपन्यांच्या हलगर्जीपणामुळे महानरातील स्वच्छता धोक्यात येत असेल व याचा जनआरोग्यावर परिणाम होत असेल तर संबंधित कंपन्यांना अल्टिमेटम देऊन स्वच्छतेची ही कामे झोननिहाय देण्याबाबत आराखडा तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले.

**एक ऑगस्टपासून प्रत्येकाच्या घरासमोर एक झाड**

वृक्ष लागवडीबाबत महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली एक व्यापक चळवळ हाती घेतली आहे. यात नागपूर जिल्ह्यात लोकसहभागातून आपल्याला चांगले काम करण्याची संधी असून प्रत्येक घरासमोर एक झाड हे अभियान यशस्वी करायचे आहे. यासाठी प्रत्येक विभाग प्रमुखांनी पुढे सरसावले पाहिजे. याचबरोबर विविध सेवाभावी संस्था, नागरिकांना उत्स्फूर्त सहभागी करून रोपांच्या नियोजनाबाबत खबरदारी घेण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. याचबरोबर राष्ट्राप्रती असलेला प्रत्येकाच्या मनातील अभिमान अधिक उत्साहात साजरा करण्यासाठी हर घर तिरंगा अभियानाच्या यशस्वीतेसाठी आतापासूनच नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**हरपूरचे अतिक्रमण हटवा - महापौर**

हरपूर भागात असलेले अतिक्रमण त्वरित काढून टाकावे, असे निर्देश महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी यावेळी दिले. शहरातील अतिक्रमणाचा मुद्या अनेक आमदारांनी उपस्थित केला होता. या चर्चेत भाग घेताना महापौरांनी हरपूरचे अतिक्रमण त्वरित काढण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. यावेळी शहरातील आमदारांनी आपआपल्या मतदारसंघातील प्रमुख मुद्दे उपस्थित केले. या सर्व मुद्यांची दखल घेऊन या समस्या निकालात काढून त्याचा अनुपालन अहवाल सादर करावा, असेही निर्देश पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले.

मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त निवडलेल्या ७५ कल्पक योजनांचे या बैठकीत सादरीकरण केले. यात प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दोन अभिनव प्रकल्प राबविण्याची सूचना पालकमंत्री यांनी केली. सिमेंट रस्ते व गड्डु सोडून स्थानिक लोकांच्या मागणीवर आधारित या नावीन्यपूर्ण योजना घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या. नागपूरच्या विकासासंदर्भात आजवर ज्या काही घोषणा झाल्या असतील त्या घोषणांना अधिकाधिक लोकोपयोगी व नावीन्यपूर्णतेची जोड देऊन योजना साकाराव्यात असे त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेच्या ७५ अभिनव योजनांमध्ये जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणी, प्रगतीशील धोरणांना चालना देणे, नागरिक-केंद्रित सेवांचे बळकटीकरण करणे, शाश्वत उपजीविकेचे सक्षमीकरण करणे आदी बाबींवर विस्तृत प्रकाश टाकला. त्यांनी मनपाद्वारे सुरू असलेल्या क्वेटा कॉलनी, देवडिया रुग्णालय, बाळासाहेब ठाकरे प्राथमिक शिक्षण, कला व सांस्कृतिक केंद्र, मिनिमाता नगर येथील ३० खाटांच्या दवाखान्याचे बांधकाम, श्री लक्ष्मीनारायण आणि शिव मंदिर संकुल सुशोभीकरण, शांतीनगर इतवारी रेल्वे स्टेशनजवळच्या मंदिराचे सुशोभीकरण, श्वान निवारा केंद्र व चिकित्सा केंद्र, जिजाऊ स्मृती शोध संस्थान, टिमकी हंसापुरी स्विमींगपुल, अमृत महोत्सवाच्या निमित्ताने मुख्य द्वार, संरक्षण भिंत व परिसराचे सौंदर्यीकरण, श्रीमंत राजे राघुजीराव भोसले सभागृह टाऊन हॉल, महाल, स्व.प्रभाकररावजी दटके रुग्णालय इमारत, मोमिनपुरा येथील विद्यार्थांसाठी ई-लायब्ररी, नंदग्राम प्रकल्प, ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्प, अमृत २.० प्रकल्प आदी प्रकल्पांच्या विकासकामांचा समावेश आहे.

याचबरोबर आयुक्त डॉ. विपीन यांनी हेल्थी स्ट्रीट आणि वॉकेबल सिटी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, स्मार्ट सार्वजनिक शौचालय, घरकुल योजना, बाजार, मार्केट विकास, टाऊन वेंडीग झोन, क्रीडांगण, उद्यान, वेस्ट टू गॅस एनर्जी (सुसबिडी प्रकल्प), आपली बसचे अद्यावतीकरण, तलावाचे सौंदर्यीकरण आदींची माहिती सादर केली.

# देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त देवरी येथे भव्य मोफत आरोग्य महाशिबिराचे आयोजन

### आमदार संजय पुराम यांच्या पुढाकारातून नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवेची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, देवरी तालुका तसेच लोकजागरण फाउंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून ग्रामीण रुग्णालय, देवरी येथे भव्य निःशुल्क आरोग्य महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय पुराम यांनी विशेष पुढाकार घेतला असून, सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा हा लोकहिताचा उपक्रम असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या आरोग्य महाशिबिरात विविध आजारांची तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य सल्ला तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ज्येष्ठ नागरिक, महिला व गरजू रुग्णांना या शिबिराचा मोठा लाभ होणार असून, नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

आमदार संजय पुराम यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देवरी परिसरात सामाजिक, आरोग्य व जनकल्याणकारी उपक्रमांना चालना मिळत असून, नागरिकांच्या हितासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हे आरोग्य महाशिबिर समाजसेवेची भावना अधिक दृढ करणारे ठरणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

आरोग्य हीच खरी संपत्ती असून, प्रत्येक नागरिकाने वेळेवर आरोग्य तपासणी करून निरोगी जीवन जगावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या महाशिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टी, देवरी तालुका, लोकजागरण फाउंडेशन, नागपूर तसेच आमदार संजय पुराम यांनी केले आहे.

## आषाढी एकादशी निमित्त शाळेत भक्तिमय दिंडी उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, महाल, नागपूर येथे विद्यार्थिनींच्या सहभागातून पारंपरिक दिंडीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ, मृदुंग, भगवे ध्वज आणि विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमांसह "ज्ञानोबा-तुकाराम", "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" अशा भक्तिमय गजरात दिंडी काढली.

परिसर संपूर्ण भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. या उपक्रमातून विद्यार्थिनींना संत परंपरा, वारकरी संप्रदाय, सामाजिक ऐक्य, संस्कार आणि भारतीय संस्कृतीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. शिक्षकांनी आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थिनींना समजावून दिले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका माया बमनोटे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. अध्यक्षांच्या प्रतिनिधी सीमा फडणवीस यांनी बाल विठू माऊली आणि वारकरी यांचे कौतुक केले.

# पर्यायी शिक्षण व्यवस्थेमुळे घडतोय आमूलाग्र बदल

### पेंढाऱ्याची मुलं आता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात; शिक्षणाच्या नव्या पर्वाची यशोगाथा

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

"शिक्षण हा प्रत्येक बालकाचा जन्मसिद्ध आणि मूलभूत हक्क आहे." मात्र दुर्गम भाग, आर्थिक अडचणी, हंगामी स्थलांतर, पालकांची अशिक्षितता, सामाजिक परिस्थिती आणि विविध कौटुंबिक कारणांमुळे अनेक मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जात होती. अशा मुलांच्या आयुष्यात पुन्हा शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शासनाच्या पर्यायी शिक्षण व्यवस्थेने केले असून, ही योजना आज सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ ठरत आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा व आमगाव तालुक्यासह आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये या उपक्रमाचे अत्यंत सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. शिक्षण विभागाने शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे, घरभेटी घेऊन पालकांचे समुपदेशन करणे, ग्रामस्तरावर जनजागृती करणे आणि सातत्याने पाठपुरावा करणे या माध्यमातून अनेक मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश मिळविले आहे. कालपर्यंत शिक्षणापासून वंचित असलेली अनेक पेंढाऱ्याची व वस्तीवरील मुले आज आत्मविश्वासाने शाळेच्या वर्गात बसलेली दिसत आहेत.

पर्यायी शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट केवळ मुलांचा शाळेत प्रवेश करून देणे इतकेच मर्यादित नाही. त्या विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणात टिकवून ठेवणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणे आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम बनविणे हे या उपक्रमाचे खरे यश आहे.

या परिवर्तनामागे शिक्षक, तहसीलदार, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि पालक यांच्या समन्वित प्रयत्नांचा मोठा वाटा आहे. प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून केलेल्या प्रामाणिक कार्यामुळे अनेक कुटुंबांच्या जीवनात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे.



पर्यायी शिक्षण व्यवस्थेमुळे शिक्षणापासून दूर गेलेल्या मुलांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, अनेक विद्यार्थ्यांनी नियमित शिक्षणात पुनर्प्रवेश करून आपल्या स्वप्नांना नवी दिशा दिली आहे. ही केवळ शैक्षणिक उपलब्धी नसून सामाजिक समतेचा आणि सर्वसमावेशक विकासाचा मजबूत पाया आहे.

शासनाचा "एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही" हा संकल्प यशस्वी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण आज शिक्षणाची संधी मिळालेला प्रत्येक बालक उद्याचा सुजाण नागरिक ठरणार आहे. शिक्षित बालक म्हणजे सक्षम कुटुंब, प्रगत समाज आणि समृद्ध राष्ट्राचा भक्कम पाया.

**– माहिती स्रोत :**
**राजकुमार बसोने**
पदवीधर शिक्षक, जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा, नवेगाव

थोडक्यात

## वेकोली रेल्वे कोल यार्डाचे काम पुन्हा सुरू, हुसेंद्र गिरडकर यांनी काम पाडले बंद



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

लोकवस्ती आणि शेतशिवाराजवळ उभारण्यात येणाऱ्या 'कोल यार्ड' मुळे (कोळसा डेपो) होणाऱ्या तीव्र प्रदूषणाला आणि आरोग्याच्या समस्यांना गावकऱ्यांनी यापूर्वीच जोरदार विरोध दर्शवला होता. या तीव्र विरोधानंतर काही काळ थंडावलेले वेकोली रेल्वे याडार्चे काम आता इतक्या दिवसांनंतर पुन्हा अचानक सुरू झाल्याचे माहिती आल्यानंतर स्थानिक नगरसेवक रोशन गेडाम, रॉकी गायकवाड, प्रविन चावट, प्रकाश भोयर, विशाल पीलेवान, मुकेश टवकर,गौरव मने,कमलाकर पेदे ,पवन धुडे, विशेष लोखंडे,सागर झोडापे,राजू मोहनकर,राघोजी गिरडकर,जीशान सिद्धकी ,गुड्डू भाडारकर,रोशन मोहतुरे, हर्षल वानखेडे सोबत घेत कोल यार्ड ठिकाणावर पोहचत सुरू असलेल्या कामाला जोरदार विरोध केला.

हुसेंद्र गिरडकर यांनी तेथे सुरू असलेल्या कामाबाबत प्रशासनाला जाब विचारत त्यांनी सुरू असलेले काम तात्काळ थांबवण्याची विनंती केली व विरोध दर्शवून काम बंद पाडले. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हुसेंद्र गिरडकर यांनी आमदार संजयजी मेश्राम यांना दूरध्वनीद्वारे घटनेची सविस्तर माहिती दिली.

**गावकऱ्यांचा विरोध का ?**

गंगापूर, कावरापेठ आणि बुधवारी पेठ या लोकवस्तीच्या व शेतशिवाराच्या अगदी जवळ हे कोल यार्ड तयार केले जात आहे.

**प्रदूषण व आरोग्यः**

कोळशाच्या वाहतुकीमुळे आणि उडणाऱ्या भुकटीमुळे परिसरात मोठे प्रदूषण पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती आहे.

**शेतीचे नुकसान**

यार्डालगत शेकडो एकर शेती असून, कोळशाच्या धूळ आणि वाहतुकीमुळे पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

नागरिकांचा व गावकऱ्यांचा तीव्र विरोध असतानाही प्रशासनाने किंवा संबंधित कंपनीने गुपचूप काम सुरू केल्याने गावकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. आमदार संजयजी मेश्राम या विषयावर काय भूमिका घेतात आणि हे काम पूर्णपणे बंद पाडण्यासाठी काय पावले उचलतात, याकडे आता संपूर्ण उमरेड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## आदर्श विद्यालयात विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाची निवडणूक उत्साहात, विद्यार्थ्यांनी अनुभवली लोकशाही प्रक्रिया




**उमेदवारीपासून मतमोजणीपर्यंत पारदर्शक प्रक्रिया; तहसीलदार मोनिका कांबळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव येथील आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाची निवडणूक लोकशाही पद्धतीने उत्साहात पार पडली. या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने मतदान करून लोकशाही मूल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. आमगाव येथील आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाची निवडणूक अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. उमेदवारी अर्ज भरणे, प्रचार, मतदान आणि मतमोजणी हे सर्व टप्पे पारदर्शक व नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आले. मतदान केंद्रावर विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्था, मतदानाचे महत्त्व, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

यावेळी तहसीलदार मोनिका कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगत योग्य प्रतिनिधीची निवड करण्याचे आवाहन केले. विद्यालयाचे प्राचार्य दिनेश एम. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी निवडणूक अधिकारी व कर्मचारी म्हणून जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. मतमोजणीनंतर विजयी उमेदवारांची घोषणा होताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापकांनी निवडून आलेल्या प्रतिनिधींना प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले, तसेच सर्व उमेदवारांच्या क्रीडाभावनेचे आणि विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागाचे कौतुक केले. विद्यालयात अशा लोकशाही उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, सहकार्य, जबाबदारी आणि आदर्श नागरिकत्वाचे संस्कार अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. निवडणूक यशस्वी पार पाडण्यासाठी प्राचार्य दिनेश एम. राऊत, उपमुख्याध्यापक यू. एस. मेंढे, पर्यवेक्षक सुनील मानकर, ज्येष्ठ शिक्षक राजू पटले, निवडणूक अधिकारी ललित पटले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# समाजसेवेच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव

## 'ऑरेंज सिटी आयकॉन अवॉर्ड्स २०२६' चा सोहळा उत्साहात साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महिमा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नागपूर यांच्या वतीने आयोजित 'ऑरेंज सिटी आयकॉन अवॉर्ड्स २०२६' या पुरस्कार सोहळा रामदासपेठ येथील अमृत भवन येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात महिला सक्षमीकरण, सामाजिक विकास आणि समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रांतील



मान्यवरांचा सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला नगरसेविका ऋतिका पसराम, नगरसेवक योगेश पाचपोर, इन्फंट इंडिया संस्थेचे समाजसेवक दत्ताभाऊ बरगजे, विश्व युवक केंद्राच्या मुक्ता भारद्वाज, दयानंद कुबल, जयंत पाठक, समाजसेवक अरविंद गेडाम, महिमा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष शीतल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुरस्कार प्राप्त व्यक्तीचे अभिनंदन करताना दत्ताभाऊ बरगजे म्हणाले, समाजाने नाकारलेल्या एचआयव्ही बाधित अनाथ बालकांना आणि निराधार महिलांना सन्मानाचे आयुष्य मिळवून देण्यासाठी सेवाभावी संस्थांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज आहे. यावेळी विश्व युवक केंद्राच्या प्रतिनिधी मुक्ता भारद्वाज यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करत युवा विकास आणि नारीशक्तीच्या योगदानावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्तावना करुणा बांगर-गर्गे यांनी केले तर आभार प्रदर्शन शितल पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आदिवासी निराधार महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष बबिता धुर्वे, अनुष्का एज्युकेशन अकॅडमी अँड कल्चरल संस्थेचे अध्यक्ष अरविंद गेडाम, गुलमोहर संस्थेच्या सचिव नंदा कोल्हटकर, पूनम नवनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष बेबी गौरीकर व प्रताप काशीकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## वलनीतील एनडीपीएस प्रकरणातील फरार आरोपी अखेर जेरबंद

**गांजा तस्करी, अवैध शस्त्रसाठा प्रकरणात खापरखेडा पोलिसांची कारवाई, आतापर्यंत १० आरोपींपैकी ९ जण अटकेत**

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

वलनी येथील डब्ल्यूसीएल कॉलनीतील क्वार्टर क्रमांक ४९ येथे उघडकीस आलेल्या गांजा तस्करी व अवैध शस्त्रसाठा प्रकरणातील तब्बल १५ महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला खापरखेडा पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे बहुचर्चित एनडीपीएस प्रकरणाच्या तपासाला आणखी गती मिळाली आहे. खापरखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३४/२०२५ अन्वये एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २०(ब)(२)(ब), २९ तसेच भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३/२५, ५/२५ आणि महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) १९९९ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणात यापूर्वी आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग, गब्बर दत्तुजी जुभळे, रोहित देशराज सूर्यवंशी, उदयभान गंगासागर चव्हाण, विश्वास राहुल सोलंकी, सूरज उर्फ बारीक रमेश वरणकर आणि शारोप उर्फ शारुख रमेश राजपूत या आठ आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र राकेश उर्फ सोनू शिवलाल सूर्यवंशी (वय ३०, रा. वलनी) हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता.वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तपास पथकाने वलनी परिसरात सापळा रचून राकेश सूर्यवंशी याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील तपासासाठी सहाय्यक पोलिस आयुक्त, कामठी विभाग यांच्या समक्ष त्याला हजर करण्यात आले.या गुन्ह्यात यापूर्वीच्या कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन माऊजर पिस्तुले, दोन देशी कट्टे, ३६ जिवंत काडतुसे, दोन रिकामी काडतुसे, दोन मॅगझिन, १ किलो २८.०५ ग्रॅम गांजा, आठ मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, प्लास्टिक पिशव्यांचे बंडल असा सुमारे ३ लाख ११ हजार ८०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला होता.

आज सदर राकेश सुर्यवंशी नावाचा आरोपीला न्यायालयात हजर करून न्यायालयाने जेलपास करून तुरुंगात रवाणगी करण्यात आली.सदर कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक हरीश रुमकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक विलास करंगामी, पोलिस हवालदार आलोक रावत, महिला पोलिस हवालदार कविता गोंडाणे, पोलिस शिपाई प्रितम ठाकूर व तपास पथकाने केली.ही कारवाई पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ६ डॉ. संदीप पखाले आणि सहाय्यक पोलीस आयुक्त, कामठी विभाग अंकुश खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## निमखेडा येथील विश्रांती कॉन्व्हेंट स्कूलमध्ये आषाढी एकादशी भक्तीभावाने आणि शिस्तीने

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

निमखेडा येथील विश्रांती कान्व्हेंट स्कुलमध्ये मध्ये आषाढी



एकादशीचा सण मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल आणि रुक्मिणी यांच्या स्तोत्रांनी आणि अभंगांनी झाली. मुलांनी दिंडीचा वेश धारण करून शाळेच्या आवारात 'ज्ञानबा तुकाराम'चा जप केला. प्रार्थना सभेत, शिक्षकांनी आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगितले की ,हा दिवस भक्ती आणि समानता, सेवा आणि शिस्त यांचे प्रतीक आहे. विठ्ठलाचा वेश धारण केलेल्या लहान मुलांपैकी काहींनी तुकारामांचे अभंग म्हटले. शेवटी, सर्व मुलांना तुळशीचा प्रसाद वाटण्यात आला.

याप्रसंगी मुख्याध्यापिका शांता खांडेकर, संचालिका बिंदू तगिरिसा, अध्यक्ष रक्षक खांडेकर म्हणाले की, "मुलांना आपली संस्कृती आणि संत परंपरेशी जोडणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे." कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद प्रियंका दोरखंडे, पल्लवी राऊत, वैभवी येळणे, प्राची, शारदा किरपाण ,मंगला काटकर, उषा भिवगडे, सरिका चोखांद्रे, पल्लवी बरबटे, रीना दारोडे, शालेमराज विदुरी, लतिका झाडे, कोमल तिडके व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जनसेवा सप्ताहांतर्गत राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सालेकसात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत शेकडो रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

महाराष्ट्राचे लोकनेते तथा लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित "जनसेवा सप्ताह" अंतर्गत सहाव्या दिवशी, सोमवार दि. २७ जुलै २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तालुका सालेकसा यांच्या वतीने भाई रामसिंगजी गुरुद्वारा हॉल, सालेकसा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुलभाई पटेल तसेच खासदार राजेंद्रजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष सुरेशजी हर्षे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राज्य सरचिटणीस (ओबीसी आघाडी) प्रभाकरजी दोनोडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष डॉ. अजयजी उमाटे व जिल्हा महासचिव डॉ. हिरालालजी




साठवणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी तालुका भाजपचे महामंत्री विक्कीजी भाटिया, मोक्षधाम सेवा समितीचे कोषाध्यक्ष सुनिलजी असाटी, माजी जिल्हा परिषद सदस्य बिसरामजी चर्जे, सालेकसा हायस्कूलचे मुख्याध्यापक आर. बी. वैद्य, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष विनोदजी चुटे, किशनजी रहांगडाले, ज्येष्ठ कार्यकर्ते रघुदासजी नागपुरे, ओमप्रकाशजी लिल्हारे, संदीप राऊत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी स्वयंस्फूतीर्ने रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपत रुग्णांसाठी जीवनदायी ठरणाऱ्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करावे, असे आवाहन केले.

या शिबिरासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया येथील रक्तपेढीच्या पथकाने मोलाचे सहकार्य केले. आंतरवासिता पवन जोगदंड, रक्तसंक्रमण विभागाच्या डॉ. हुमा शेख, समाजसेवा अधीक्षक विजय बिसेन, अधिपरिचारक मिर्झा उबेद, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित मून, प्रयोगशाळा सहाय्यक गणेश हुले, परिचर प्रतिक बन्सोड, तुषार तुरकर, वाहनचालक ईश्वर चुटे, परिचारिका साक्षी पटले, जयश्री कोबडे व सुहानी लिल्हारे यांच्या संपूर्ण चमूने शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, महिला शहराध्यक्ष सुनिता थेर, अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्ष नासिर अली सैयद, युवती अध्यक्ष सुषमाताई राऊत, युवक आघाडीचे राहुल साठवणे, तालुका उपाध्यक्ष ध्रुवकुमार हुकरे, महिला आघाडीच्या ममताताई बघेले, प्रियंका ब्राम्हणकर, तसेच बबलू मानकर, राहुल जंगेरे, ऋषी बैस, राजा बर्वे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिले.

शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तालुका सालेकसा तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया यांच्या वतीने प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच रक्तपेढीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. समाजहितासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## सौंदड येथे महिलेच्या घरातून तब्बल ५.८६६ किलो गांजा जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत सडक अर्जुनी तालुक्यातील फुटाळा (सौंदड) येथील एका महिलेच्या घरातून ५ किलो ८६६ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ५ लाख ८६ हजार ६०० इतकी आहे. पोलीस अधीक्षक गोरख भामरे व अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगमजुडे यांच्या पथकाने २६ जुलै रोजी ही कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी फुटाळा (सौंदड) येथील अनीता अशोक मोहनकर (वय ५३ वर्षे) यांच्या घरावर छापा टाकला. पंचांसमक्ष झडती घेतली असता प्लास्टिकच्या पोत्यामध्ये हिरव्या रंगाची पाने, फुले व बिया मिश्रित ५.८६६ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी संपूर्ण गांजा जप्त करून आरोपी महिलेला ताब्यात घेतले. तिच्याविरुद्ध दुग्गीपार पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगमजुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ओमप्रकाश जामगडे, पोहेकॉ तुलसीदास लुटे, प्रकाश गायकवाड, दुर्गेश तिवारी, सुनील डाहाके, राकेश इंदुरकर आणि चालक विलास ठाकरे यांच्या पथकाने केली.

## गादा (नेरी) येथे ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरणास शासनाची मंजुरी

**ग्रामीण भागातील वीज पायाभूत सुविधा होणार सक्षम, महावितरणला ०.४० हेक्टर जागा उपलब्ध, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्याला यश**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कामठी तालुक्यातील मौजा गादा (नेरी) येथील जिल्हा परिषदेच्या मालकीची ०.४० हेक्टर जागा ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) यांच्याकडे हस्तांतरित करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने गादा (नेरी) व परिसरातील नागरिकांना अधिक दर्जेदार,स्थिर आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील आदेश जारी केले असून, संबंधित जागा नियमानुसार महावितरणकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या जागेवर नवीन ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारण्यात येणार असून, वाढती वीज मागणी लक्षात घेता या प्रकल्पामुळे वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. तसेच भविष्यातील औद्योगिक,कृषी व घरगुती वीज गरजांची पूर्तता करण्यासही मदत होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन उर्जा विभागात पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कटिबद्ध असून,या निर्णयामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम, गतिमान आणि नागरिकाभिमुख होईल. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री मा. जयकुमार गोरे यांचे मनःपूर्वक आभार.

गादा (नेरी) परिसरातील नागरिकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळावा, ही शासनाची प्राथमिकता आहे.या विद्युत उपकेंद्रामुळे परिसरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होईल. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सातत्याने निर्णय घेत आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.